दि. ११/०३/२३

① लोकसत्ता पान नं. ०५

## मुख्यमंत्र्यांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य

# ठाकरे गटाच्या उपजिल्हाप्रमुखांविरोधात गुन्हा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविषयी आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांच्याविरोधात वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी मुंबईतील माजी नगरसेविका राजुल पटेल यांच्याविरोधातही नौपाडा आणि बाजारपेठ पोलीस ठाण्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविषयी आक्षेपार्ह विधान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वागळे इस्टेट एका बांधकामाविषयी घाडीगावकर यांनी आक्षेप घेतला होता. त्या वेळी त्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याविषयी आक्षेपार्ह विधान केले होते. या घटनेनंतर शिवसेनेचे कोपरी पाचपाखाडी विधानसभेचे समन्वयक एकनाथ भोईर, माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख शैलेश कदम आणि माजी परिवहन सदस्य दशरथ यादव यांनी गुरुवारी रात्री उशिरा घाडीगावकर यांच्याविरोधात तक्रार दाखल केली. या आधारे, दोन गटांत तेढ निर्माण केल्याप्रकरणी घाडीगावकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

② लोकसत्ता पान नं. ०६

# वर्सोवा - विरार सागरी सेतू आता पालघरपर्यंत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मुंबईतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आणि अतिजलद प्रवासाचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या वर्सोवा ते विरार सागरी सेतूचा विस्तार आता थेट पालघरपर्यंत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) १५४ व्या बैठकीत या सेतूच्या विस्तारास मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयानुसार, एमएमआरडीएकडून आता विरार ते पालघर सागरी सेतू प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडील (एमएसआरडीसी) ४२.७५ किमीचा वर्सोवा-विरार सागरी सेतू गेल्या वर्षी एमएमआरडीएकडे वर्ग करण्यात आला. त्यानंतर प्रकल्प मार्गी लावण्याच्या दृष्टीने एमएमआरडीएने आजच्या बैठकीत प्रस्ताव मंजुरीसाठी ठेवला होता. त्यानुसार प्राधिकरणाने ६३ हजार ४२६ कोटी रुपयांच्या वर्सोवा ते विरार सेतूला तसेच या सेतूमधील ५१.९७ किमीच्या जोडरस्त्याला मान्यता दिल्याची माहिती महानगर आयुक्त एस.व्ही.आर. श्रीनिवास यांनी दिली. सेतूचा विस्तार विरार ते पालघर असा करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचेही सांगितले. विरार ते पालघर असा किमान ७ ते ८ किमीने सागरी सेतूचा विस्तार होणार आहे.

Scanned with CamScanner

दि. ११/०२/२३

(३) लोकसत्ता पान नं. ३५

# रुग्णालय, डॉक्टरांकडून औषध खरेदीची सक्ती

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** वसई, विरार शहरातील खासगी रुग्णालयातून तसेच दवाखाने चालविणाऱ्या डॉक्टरांकडून विशिष्ट दुकानातूनच औषधे विकत घेण्याची सक्ती करण्यात येत आहे. अशा प्रकारची सक्ती करता येत नसल्याचा अध्यादेश असतानाही त्याची अमलबजावणी केली जात नाही. याप्रकरणी डॉक्टर आणि औषध कंपन्यांचे साटेलोटे असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

प्रत्येक खासगी रुग्णालायत रुग्णालयाचे औषध विक्री दुकान असते. रुग्णालयात उपचारासाठी दाखल झालेल्या रुग्णांना याच रुग्णालयातून ही औषधे घेण्याची सक्ती करण्यात येते. याबाबत अन्न व औषध प्रशासनाने ९ डिसेंबर २०२२ रोजी पुन्हा एक परिपत्रक काढून रुग्णालयातील औषध दुकानातून औषधे खरेदी करण्याची सक्ती करता येणार नसल्याचे स्पष्टपणे निर्देश दिले होते. रुग्णालयातील रुग्ण राज्यातील कुठल्याही परवानाधारक औषध दुकानातून औषधे विकत घेऊ शकतो असे या आदेशात म्हटले होते. तसेच प्रत्येक रुग्णालायत अशा आशयाचा फलक लावणे देखील बंधनकारक करण्यात आले होते. मात्र वसई विरार मधील रुग्णालयातून या नियमांचे पालन होत नसल्याच्या तक्रारी रुग्णांनी केल्या आहेत.

## विशिष्ट दुकानांतच औषधांची उपलब्धता

रुग्णालयांप्रमाणे खासगी दवाखाने चालवणाऱ्या डॉक्टरांकडून देखील विशिष्ट औषध विक्री करणाऱ्या दुकानातून औषधे घेण्याची सक्ती करण्यात येत असते. खासगी रुग्णालये आणि खासगी डॉक्टर यांचे औषध विक्री करणाऱ्या कंपन्यांबरोबर आर्थिक व्यवहार असतात. त्यामुळे विशिष्ट दुकानात विशिष्ट औषधे घेण्याची सक्ती केली जाते, असा आरोप रुग्णमित्र राजेंद्र ढगे यांनी केला आहे. दरम्या, या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल, अशी माहिती पालघरच्या ड्रग्ज निरिक्षक आरती कांबळे यांनी दिली. डॉक्टर विशिष्ट कंपन्यांचीच औषधे विकत घेण्याचे सांगत असतील तर त्यासंदर्भात कारवाई करू शकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

(६) लोकसत्ता पान नं. ३६.

# कारखान्यातील आगीत एकाचा मृत्यू

## तीन जण जखमी

लोकसत्ता वार्ताहर

**वसई :** वसई पूर्वेच्या सातीवली येथील एका रासायनिक द्रव पदार्थ ठेवण्यात आलेल्या कारखान्यात भीषण आग लागल्याची घटना गुरुवारी सायंकाळी चारच्या सुमारास घडली. यात एका महिलेचा मृत्यू झाला तर तीन जण जखमी झाले आहेत.

सातीवली, मोरया नाका या परिसरात एका कारखान्यात रासायनिक द्रव पदार्थ असलेले ड्रम भरून ठेवण्यात आले होते.



अचानकपणे या रासायनिक पदार्थांना लागलेल्या आगीमुळे एकामागोमाग एक असे स्फोट सुरू झाले. मात्र आगीची तीव्रता अधिक असल्याचे यात चार जण होरपळले आहेत. यात सूरय्या बानू (८५) या महिलेचा मृत्यू झाला आहे. तर विजय यादव (३५), कमलेश पासवान (२४), दिनेश पासवान (२५) हे तीन जण जखमी झाले आहेत. या जखमींवर सर डी एम पेटिट व अग्रवाल या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

आगीचे लोळ व स्फोट यामुळे आग विझविण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना अडचणी येत होत्या. जवळपास एक ते दीड तासाच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आली. शॉट सर्किट झाल्याने ही आग लागली असल्याचा अंदाज अग्निशमन दलाच्या जवानांनी वर्तविला आहे.

Scanned with CamScanner

दि. ११/०३/२३

(५) महाराष्ट्र टाईम्स पान नं. ०४

# राजूल पटेल यांना ठाण्यात प्रवेशबंदी

म. टा. प्रतिनिधी, ठाणे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविषयी सातत्याने आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या मुंबईतील माजी नगरसेविका आणि विभाग संघटक राजूल पटेल यांना पोलिसांनी दोन महिने ठाणे पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत येण्यास प्रतिबंध केला आहे. ३ मार्च ते १ मे या कालावधीमध्ये पटेल यांना प्रवेशबंदी करण्यात आली असून याबाबत विशेष शाखेचे उपायुक्त डॉ. श्रीकांत परोपकारी यांनी आदेश काढले आहेत. पोलिस आयुक्तालयामध्ये प्रवेश केल्यास कारवाई करण्याचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

ठाण्यातील गडकरी रंगायतनमध्ये २६ फेब्रुवारीला शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचा शिवगर्जना मेळावा पार पडला होता. या मेळाव्यात पटेल यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविषयी आक्षेपार्ह व्यक्तव्य केले. या वक्तव्याप्रकरणी शिवसेनेचे (शिंदे गट) माजी नगरसेवक विकास रेपाळे यांच्या तक्रारीनंतर पटेल यांच्याविरुद्ध नौपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर कल्याणमधील शिवगर्जना मेळाव्यातही पटेल यांनी मुख्यमंत्र्याविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने त्यांच्याविरुद्ध बाजारपेठ पोलिस ठाण्यात ३ मार्चला आणखी एक गुन्हा दाखल झाला. पटेल यांच्याविरुद्ध लागोपाठ दोन गुन्हे दाखल झाल्याने त्यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. परंतु, पटेल यांच्या वक्तव्यामुळे दोन गटांमध्ये तेढ निर्माण होऊन कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पटेल यांना ठाणे पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत येण्यास दोन महिन्यांसाठी प्रतिबंध करण्यात आला आहे. याबाबतचे आदेश नुकतेच विशेष शाखेचे उपायुक्त डॉ. श्रीकांत परोपकारी यांनी काढले असून पटेल यांना पोलिस अधिकाऱ्यांनी घरी जाऊन ही नोटीस दिली. हा आदेश ३ मार्च ते १ मे रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहणार आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांच्यासह चार जणांविरुध्द शुक्रवारी वागळे इस्टेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

(६) म. टा. पु. पान नं. ०७

## मसाज पार्लरवर कारवाई

**मिरा-भाईंदर :** मिरा रोडमध्ये एका मसाज पार्लरवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधित कक्षाकडून कारवाई करण्यात आली. यामध्ये काम करणाऱ्या तरुणींना पुरुष ग्राहकांशी अश्लील कृत्य करण्यास सांगितले जात असल्याची माहिती मिळताच हा बडगा उगारण्यात आला. मिरा रोडच्या बेवर्ली पार्क येथील डीवाइन स्पा नामक मसाज पार्लरमध्ये पार्लर चालक व मॅनेजर हे काम करणाऱ्या तरुणींना पुरुष ग्राहकांशी अश्लील कृत्य करण्यास सांगत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधित कक्षाला मिळाली होती. त्यानुसार त्यांनी बोगस ग्राहक पाठवून खात्री करून घेतली. यानंतर छापा टाकला. पोलिसांनी पार्लरचा चालक अभिजीत दास, मॅनेजर ललरूथ फेरी व चार तरुणींना ताब्यात घेत, त्यांच्या विरोधात मिरा रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

Scanned with CamScanner

(७) पुढारी ५/१०/१९ (८)

# दोन वर्षांच्या बाळासह आईचा आत्महत्येचा प्रयत्न

## वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेमुळे दोघांचा जीव वाचला

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर भाईंदर पूर्व पश्चिमेला जाणाऱ्या उड्डाणपुलावरून एका महिलेने आपल्या दोन वर्षांच्या बाळसह उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. या महिलेला जवळच असलेल्या वाहतूक पोलिसांनी पोहोचून पंडित भीमसेन जोशी या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल . केल्यामुळे दोघांचाही जीव वाचला आहे.

मिरारोड येथील साईबाबा नगर येथे राहणारी २१ वर्षीय महिला ही तिच्या दोन वर्षांच्या बाळसह घरातून निघून भाईंदर पूर्व पश्चिमेला जोडणाऱ्या गोल्डन नेस्ट येथील उड्डाणपुलावर आली. त्या पुलावरून तिने बाळासह गुरुवारी सायंकाळी उडी मारली. यावेळी जवळच असलेल्या वाहतूक पोलिसांनी रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांनी माहिती दिली.

त्यावेळी वाहतूक पोलीस हे घटनास्थळी दाखल होत त्या मायलेकांना खाजगी वाहनाने जवळच्या शासकीय पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. या घटनेत महिलेच्या बाळाचा पाय फ्रॅक्चर झाला आहे. तर महिलेच्या कंबरेला व इतर ठिकाणी जबर मार लागला आहे. त्या दोघांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या महिलेने आत्महत्या करण्याचा टोकाचा निर्णय का घेतला, याचा पोलीस तपास करत आहेत.

# मांडुळाची तस्करी प्रकरणी १ अटकेत

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नालासोपारा परिसरात पैशाचा पाऊस पाडण्याच्या अंधश्रद्धेतून मांडूळ जातीच्या सापाची तस्करी करणाऱ्या इसमाला मध्यवर्ती गुन्हे शाखेने अटक केली आहे.

नालासोपारा पूर्व येथील ओसवाल नगरी रिक्षा स्टॅण्डजवळ एक इसम मांडूळ जातीच्या सापाची तस्करी करण्यासाठी येणार असल्याची माहिती मध्यवर्ती गुन्हे शाखेला मिळाली. त्यानुसार त्यांनी त्या ठिकाणी सापळा रचून आरोपी फुरकान हसिनुदीन अन्सारी याला ताब्यात घेतले. त्याची तपासणी केली असता त्याच्याकडे एका गोणीत एक मांडूळ जातीचा जिवंत साप दिसून आला. या सापाचा वापर औषधी पदार्थ व काळी जादुसाठी वापरला जात असल्याचे सांगितले जाते. आरोपीने त्या सापाची विक्री करण्यासाठी आणले होते.

(९) पुढारी ५/१०/१९

# चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

## ४ लाख ५८ हजाराचा मुद्देमाल जप्त, तुळींजमधील घटना

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

तुळींज पोलीस ठाणे हद्दीत चोरी करणाऱ्या आरोपीस तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली असून त्याच्याकडून ४, ५८, ५६० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



तुळींज पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या सुनिती विस्पी रिडर यांच्या घरातील कपाटातील अंदाजे ४,७७,००० रुपये किमतीचे सोन्याचे, डायमंडचे दागदागिने व एक मोबाइल फोन अज्ञात चोरट्याने चोरी केल्याबाबत तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी करून सुनिती विस्पी रिडर यांच्या घरी काम करणारा मुलगा उत्तम ज्ञानेश्वर खंदारे यास चौकशीसाठी ताब्यात घेवून त्याचेकडे विचारपुस केली असता तो असमाधानकारक तसेच दिशाभुल करणारी उत्तरे देत होता. तसेच पोलीसांच्या चौकशी टाळण्यासाठी खंदारे याने फिनेल पिवुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करून तपास प्रक्रियेत अडथळा आणण्याचा प्रयत्न केला होता. खंदारे हा गुन्हा घडलेल्या दिवशी विधीसंघर्ष बालक याच्या वारंवार संपर्कात असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी खंदारे व विधीसंघर्ष बालक यांच्याकडे तपास केला असता त्यांनी आपसात संगनमत करून सुनिती विस्पी रिडर यांच्या घरातील सोन्याचे दागिने चोरी केल्याचे उघडकीस आले. आरोपी यांच्याकडून या गुन्हयात चोरी केलेले ४,५८,५६० किमतीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. आरोपीस अटक करून विधीसंघर्ष बालकास बाल न्याय मंडळ, भिवंडी येथे हजर करण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

दि. ११/०३/२२

(१०) पुढारी पृ. ५/१०/०२

# विरारमध्ये भव्य शिवोत्सव सुरू

**विरार : पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनावर आधारित शिवोत्सव कार्यक्रम अमेय क्लासिक क्लब येथे संचालिका ग्रीष्मा राजीव पाटील यांच्या पुढाकाराने आयोजित केला असून तो १२ मार्चपर्यंत विविध कार्यक्रमाच्या आयोजनाने साजरा होत आहे.

विरार पश्चिमेकडील यशवंतनगर येथील अमेय क्लासिक क्लबच्या प्रांगणात उभारलेल्या शिवाजी महाराज व त्यांच्या काळातील शस्त्रे, किल्ले, त्या काळातील शिवसृष्टीचा प्रत्यय देणारी रांगोळी, व्याख्याने अशा विविध स्वरुपात तीन दिवसाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी यशवंत नगर, विराट नगर अशी परिसरातून सायंकाळी अमेय क्लासिक क्लबपर्यंत मिरवणूक काढण्यात आली.

घोडदळ, लेझिम पथक व ढोल ताशांच्या गजरात शिवशाहीची आठवण देणारी ही भव्य मिरवणूक होती.

शिवोत्सवाचा उद्घाटन सोहळा सकाळी प्रथम महापौर राजीव पाटील, संचालिका ग्रीष्मा पाटील व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत श्रीफळ वाढवून करण्यात आले. हा कार्यक्रम तीन दिवस चालणार आहे.

Scanned with CamScanner

दि. ११/०३/२०२२.

(११)

# घरातून गेलेल्या तीन मुलींचा पोलिसांनी लावला सहा तासांत शोध

**मीरा रोड :** येथे राहणाऱ्या तीन अल्पवयीन मैत्रिणी घरी जाण्यास उशीर झाला म्हणून घाबरून गेल्या. त्या कोणालाच न सांगता पळून जात असताना काशिमीरा पोलिसांनी सहा तासांत त्यांचा शोध घेऊन पालकांच्या ताब्यात दिले.

मीरा रोड येथे राहणाऱ्या तीन अल्पवयीन मुली वंदना चक्रे गार्डनमध्ये खेळण्यासाठी गेल्या होत्या. या मुली सायंकाळी सात वाजेपर्यंत घरी परत न आल्याने मुलींच्या पालकांनी त्यांचा आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला, परंतु त्या आढळल्या नाहीत. याप्रकरणी काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचे गांभीर्य व संवेदनशीलता लक्षात घेऊन या मुलींचा शोध घेण्याच्या वरिष्ठांनी सूचना दिल्या. तपास करण्यासाठी काशिमीरा पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांचे पथक नियुक्त करण्यात आले. याचा तपास करताना अपहृत तिन्ही मुली मुंबईकडून गोव्याकडे मांडवी एक्स्प्रेसमधून जात असल्याची माहिती मिळाली. यातील एका मुलीकडे मोबाईल होता. फोन लागत होता. परंतु त्या उचलत नव्हत्या. त्यामुळे त्यांच्याशी बोलणे होत नव्हते. पोलिसांनी त्यांच्या मोबाईलवरून या ट्रेनचे लोकेशन शोधले. हे लोकेशन तालुका खेड, जिल्हा रत्नागिरी येथे असल्याने खेड पोलीस ठाणे येथील पोलिसांशी संपर्क करून त्यांना या प्रकरणाची माहिती दिली. खेड पोलिसांच्या मदतीने या तिन्ही मुलींना मांडवी एक्स्प्रेसमधून ताब्यात घेऊन त्यांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले.

Scanned with CamScanner

दिनांक ११/०२/२२

(७२) मुंबई नगरी पुरवणी पान नं. ४.

# विरारमध्ये वाहतूक कोंडीने विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक हैराण!

## ▮ तोडगा काढण्याची मागणी



**। वसई ।** विरार पूर्वेकडील कोपरी नाका, साईनाथ नगर, जीवदानी पायथा, पाच पायरी तसेच जीवदानी चौक (साईबाबा मंदिर) बझार वॉर्ड परिसरात दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीने ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थी, महिला हैराण आहेत. या कोंडीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यात यावा, अशी मागणी माजी स्थायी समिती सभापती तथा शिवसेना तालुकाप्रमुख सुदेश चौधरी यांनी पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांची भेट घेऊन केली आहे. या भेटीत विरार-फुलपाडा व अन्य ठिकाणच्या समस्या चौधरी यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत.

गेल्या काही वर्षांत विरार पूर्व भागात वाहतूक कोंडीची समस्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. या परिसरातील कोपरी नाका, साईनाथ नगर, जीवदानी पायथा, पाच पायरी तसेच जीवदानी चौक (साईबाबा मंदिर) बझार वॉर्ड परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. त्यामुळे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच नोकरदार, व्यावसायिकांना निश्चित वेळात कामावर पोहोचता येत नाही. वारंवार वाहतूक कोंडी होत असल्याने परिसरातील रहिवाशांचे जीवनही असह्य झालेले आहे. त्यात या रस्त्यांवर भरत असलेले बाजार, अनधिकृत फेरीवाले तसेच अनेक ठिकाणी रस्त्यावर असलेले अडथळे दूर करणे गरजेचे असल्याचे मत या भेटीत चौधरी यांनी आयुक्तांजवळ व्यक्त केले आहे. दरम्यान, विरार पश्चिम येथील मधुबन हॉटेल ते बंजारा हॉटेलपर्यंत दुभाजक टाकण्यात यावेत, अशी त्यांनी केली आहे. या ठिकाणी असलेल्या मलांज मैदानात दररोज मोठा बाजार भरत असल्याने या बाजारात येणारे नागरिक दुचाकी व चारचाकी वाहने रस्त्यावरच उभी करत असल्याने या परिसरात रहदारीला अडथळा येतो. त्यामुळे बांधकाम विभागाला या रस्त्यावर दुभाजक उभारण्याच्या सूचना कराव्यात, अशी मागणीही सुदेश चौधरी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner

# एंटी नारकोटिक्स सेल की कार्रवाई, 55 लाख का मेफेड्रोन पकड़ा

**भायंदर :** मीरा भायंदर, वसई-विरार पुलिस कमिश्नरेट, के एंटी नारकोटिक्स सेल ने गस्त के दौरान संदिग्ध आरोपियों को गिरफ्तार कर काशीमीरा पुलिस स्टेशन में मामला दर्ज किया है। पकड़े गए 275 ग्राम मेफेड्रॉन की कीमत करीब 55 लाख बताई जाती है। प्राप्त जानकारी के अनुसार उच्च अधिकारियों द्वारा होली के दौरान ड्रग्स खरीदने और बेचने वाले आरोपियों के खिलाफ कार्रवाई करने का निर्देश दिए थे जिस पर एंटी-नारकोटिक्स यूनिट, के पुलिस निरीक्षक अमर मराठे के नेतृत्व में मिरारोड, नवघर, भायंदर क्षेत्र, मुंबई की ओर जाने वाली सड़क फाउंटेन होटल घोड़बंदर, काशीमीरा के सामने सड़क पर गशत चल रही थी उस दौरान , जहां दो व्यक्ति संदिग्ध हालत में पाए गए जिसपर नाम और पता पूछने पर उसने सुल्तान अब्दुल कादर करेंगल बताया जब उनकी तलाशी ली गई तो 145 ग्राम अमली पदार्थ पाया गया उसी प्रकार मुंबा ठाणे में रहने वाले बहुद्दीन निजामुद्दीन कादरी, से बिक्री के लिए मेफेड्रोन पाई गई जिस पर पुलिस ने उक्त अभियुक्तों के विरुद्ध काशीमीरा में एनडीपीएस एक्ट 1985 की धारा 8(सी), 22(सी), 29 के तहत मामला दर्ज किया गया है. दर्ज किया गया है और आगे की जांच एंटी नारकोटिक्स सेल द्वारा की जा रही है।




उक्त कार्रवाई पुलिस उपायुक्त (अपराध) अविनाश अंबुरे तथा अमोल मांडवे, सहायक पुलिस आयुक्त (अपराध), के मार्गदर्शन में एंटी-नारकोटिक्स सेल के पुलिस निरीक्षक अमर मराठे तथा उनकी टीम द्वारा की गई।

Scanned with CamScanner

# 'Enemy' property deal: 3 booked for scaring builder with fake ED notice

SURESH GOLANI
MIRA-BHAYANDAR

The Kashimira police registered an offence on Friday against three people for allegedly scaring a builder and his partners by showing them fake summons of the Enforcement Directorate (ED) to extort money in the guise of working out a settlement over an 'enemy property'. However, no arrests have been made so far.

In his compliant registered on Jan 22, the complainant Anand Agarwal of Salasar Builders stated that last year he was informed by one of the accused that the ED had registered a case against them under the sections of the Foreign Exchange Management Act, 1999 and Income Tax Act, 1961 for their involvement in a fraudulent deal with a foreign national to purchase one enemy property in Kashimira.

## What is Enemy Property?

Enemy properties are those whose survey numbers are registered in the names of people who migrated to Pakistan decades ago. After they accepted Pakistani citizenship and India declared Pakistan an enemy state around 1965, their properties were declared enemy properties. Large parcels of land tagged with more than 30 survey numbers falling in jurisdictions of revenue villages like Ghodbunder, Mahajanwadi and Kashi are under the scanner.

One of the accused, Mitesh Shah, also showed the builder the copy of the ED summons with an assurance that he can sort out the issue with the help of his liaison in the agency office in New Delhi in return for clearance of disputed arrears amounting Rs6.5 crore to another accused Gautam Agarwal and Rs5 lakh for himself.

Sensing something amiss, the complainant established contact with the ED through email in December 2022 and got a reply from the Assistant Director (Investigation) that said summons were bogus and fake.

After verifying the authenticity of the complaint on Friday (March 10), the Kashimira police booked Shah for forging the ED summons, and two others for allegedly circulating the documents on social media platforms.

"An offence under various sections of the Indian Penal Code has been registered against the trio for forgery, criminal conspiracy, defamation and extortion. Further investigations are underway," said Senior Police Inspector Sandip Kadam.

Scanned with CamScanner